# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ३४/२०२२

विषय : विद्यापीठ विभाग व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था येथे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत.

संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक क्र . २२९/२०२०, संदर्भ क. शै प्रवेश १२४४ दि. ११/०८/२०२०

कृपया वरिल संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करावे. सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे. सदर परिपत्रकान्वये कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०—२०२१ मधील पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांची ७५% उपस्थितीची अट शिथील करण्याबाबत आपल्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत कळविण्यात आले होते. सन २०२१—२०२२ मध्ये देखील कोरोना प्रादुर्भावामुळे तसेच महाविद्यालयात प्रत्यक्ष वर्ग सुरु करणे तसेच काही काळ बंद ठेवणे इत्यादीबाबत शासन स्तरावरुन सूचना/परिपत्रके निर्गमित करण्यात आलेली आहेत. सदर बाब विचारात घेता गेल्या शैक्षणिक वर्षाप्रमाणेच यंदाचे शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी देखील पहिल्या सत्रातील विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष वर्गातील उपस्थितीची अट शिथील करण्याबाबत मा. विभागप्रमुख विद्यापीठ विभाग/प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये/संचालक, मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी आपल्या स्तरावर निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही करावी, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/६६१ )
दिनांक : ११/०२/२०२२ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
३. मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था
— यांना विनंती की, वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा

•••



Scanned by CamScanner